**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, २ रे न्यायालय, निफाड यांचे न्यायालयात**

**सं.फौ. खटला क्रमांक ६६६/२०२३** **निशाणी– ०३**

१. अपराध घडल्याची तारीख :– १६/०३/२०२३
२. अहवालाचा / फिर्यादीची तारीख :– १६/०३/२०२३
३. फिर्यादीचे नांव, वय व त्याचे :– सरकार तर्फे लासलगांव पोलीस ठाणे

४. आरोपीचे नांव, वय व पत्ता :– सचिन शामराव शिंदे, वय ४० वर्षे,
रा. विंचूर, ता.निफाड जि.नाशिक.

५. अपराधाचे कलम :– ६(ब) २४ अन्वये शिक्षापात्र.

६. आरोपाचा तपशील :–

तुम्ही दि. १६/०३/२०२३ रोजी ०६.३० वा. विंचूर येथील दोस्ती पान शॉपमध्ये महाराष्ट्र शासनाने १८ वर्षाखालील बालकांना तंबाखुजन्य पदार्थावर विक्री करणेवर बंदी घातली असतांना रहिवासी परिसरात तंबाखुजन्य पदार्थांची विक्री करतांना मिळून आला म्हणून तुम्ही सिगारेट व तंबाखु उत्पादने, जाहिरातीसह प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनीयमन अधिनियम, २००३ चे कलम ६, ६(अ) २४ अन्वयेचा शिक्षापात्र गुन्हा केल्याची तोहमत तुमच्यावर आहे.

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त मजकूर आरोपीस वाचून व समजावून सांगण्यात आला.

SHUBHADA SIDESH SUKRE
Digitally signed by SHUBHADA SIDESH SUKRE
Date: 2026.03.16 15:27:12 +0530

**(एस. एस. सुक्रे )**
दि. १४/०३/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (२ रे न्यायालय),
निफाड

प्रश्न–१. तुम्हाला तुमचे विरुध्द दाखल झालेल्या खटल्याचे कागदपत्र मिळाले काय?
उत्तर. होय.

प्रश्न–२. तुम्हाला तुमचेवर ठेवण्यात आलेला अपराध वाचुन दाखविला तो तुम्हास समजला काय?
उत्तर. होय.

प्रश्न–३. तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर. होय. मला गुन्हा कबुल आहे.

-----------

आरोपीची सही–

समक्ष,

SHUBHADA SIDESH SUKRE
Digitally signed by SHUBHADA SIDESH SUKRE
Date: 2026.03.16 15:27:23 +0530

**(एस. एस. सुक्रे )**

दि. १४/०३/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (२ रे न्यायालय),
निफाड

**न्यायनिर्णय**

आरोपीने त्याच्याविरुध्द दोषारोपित आरोप स्वच्छेने कबूल केल्यानंतर त्यास होणा–या शिक्षेबाबत म्हणणे मांडण्याची योग्य संधी देण्यात आली. आरोपीने निवेदन दिले की, त्याचा हा पहिला अपराध आहे. त्याचेवर त्याचे कुटूंबाची जबाबदारी आहे. त्याने शिक्षा देताना न्यायालयाकडून सौम्य भूमिका अवलंबविण्याविषयी विनंती केली.

अपराधिक न्याय शास्त्राचा विचार करता, सिध्दापराध्यांना सुधारण्याची संधी देणे हा शास्ती शास्त्राचा मूलभूत सिध्दांत आहे. त्यामुळे अपराध्यांचे वय, त्याची आर्थिक कुवत, त्याचे भवितव्य व त्यांच्याकडून झालेला पहिलाच गुन्हा या सर्व बाबींचा साकल्याने विचार करता, माझ्यामते पुढील शिक्षा न्यायोचित राहील. सबब, निम्न आदेशः–

आदेश

आरोपीस सिगारेट व तंबाखु उत्पादने, जाहिरातीसह प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनीयमन अधिनियम, २००३ चे कलम ६, ६(अ) २४ अन्वयेचा शिक्षापात्र गुन्ह्यासाठी अपराधिक प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५२ नुसार सिध्दापराधी घोषित करण्यात येत आहे.

आरोपीस त्याने केलेल्या सिगारेट व तंबाखु उत्पादने, जाहिरातीसह प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनीयमन अधिनियम, २००३ चे कलम ६, ६(अ) २४ च्या उल्लंघनार्थ दोषसिध्द गुन्हयासाठी अपराधिक प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५२ नुसार **रक्कम रु.३००/–** इतक्या रकमेच्या द्रव्यदंडाची शिक्षा ठोठाविण्यात येत

आहे. आरोपीने उक्त द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्यास त्यापोटी एक दिवसाच्या साध्या कारावासाची शिक्षा ठोठाविण्यात येत आहे.

SHUBHADA SIDESH SUKRE

Digitally signed by SHUBHADA SIDESH SUKRE
Date: 2026.03.16 15:27:31 +0530

**(एस. एस. सुक्रे )**

दि. १४/०३/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (२ रे न्यायालय),
निफाड